महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

सिंदपूरी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील तलाव फुटल्याने घराचे नुकसान होवून विस्तापित झालेल्यांना पक्के घर मिळण्याबाबत

(१) ३५२२ (२३-०१-२०१४). श्री.चरण वाघमारे (तुमसर) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदपूरी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील तलाव फुटल्याने १०१ घराचे नुकसान झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत विभागाने १०१ लोकांची कायमस्वरुपी राहण्याची व्यवस्था केली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. एकनाथराव खडसे (३०-०६-२०१५) : (१) हे खरे आहे.

(२) दिनांक २३/०७/२०१४ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे सिंदपुरी येथील मालगुजारी तलावाची पाळ फुटून गावातील घरात पाणी शिरल्यामुळे बाधीत १०१ कुटुंबांना तात्पुरत्या स्वरुपात गावातील सुरक्षीत ठिकाणी हलविण्यात आले होते. २५ कुटुंबाचे घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने व ती घरे राहण्यास योग्य नसल्याने २५ कुटुंबाकरीता शेडची व्यवस्था करण्यात आली असून सदर शेडमध्ये २५ कुटुंबे वास्तव्यास आहेत.

(३) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा भंडारा मार्फत दारिद्र रेषेखालील ५२ कुटुंबाकरीता घरकुलाचे प्रस्ताव ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडे सादर करण्यात आलेले आहे.

वसना व वांगणा (ता.कोरेगाव, जि.सातारा) उपसाजलसिंचन योजनेतील शेतक-यांच्या जमिनीबाबत

(२) ६१४३ (०८-०४-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.रमेश कदम (मोहोळ) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्यातील वसना व वांगणा उपसाजलसिंचन योजनेमध्ये ज्या शेतक-यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या त्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन करून शेतकऱ्यांना ७/१२ च्या उताऱ्यावर पुनर्वसानाचे शिक्के मारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ७/१२ उताऱ्यावर पुनर्वसानाचे शिक्के मारल्यामुळे शेतकऱ्यांना जमिनीचे व्यवहार करण्यास अडचणी निर्माण झाल्यामुळे ७/१२ उताऱ्यावरील पुनर्वसनाचे शिक्के उठविण्याबाबत मागणी तेथील लोकप्रतिनिधींनी अनेकवेळा करून तसेच पुन्हा दि.१५/१२/२०१४ रोजी महसूल, मदतकार्य व पुनर्वसन मंत्र्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६) : (१) हे खरे नाही.

वसना व वांगना उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना जमिनीवर इतर हक्कात पुनर्वसनासाठी राखीव ठेवण्याचे शेरे नोंदविण्यात आले होते.

(२) अंशत: खरे आहे.

७/१२ उताऱ्यावरील पुनर्वसनाचे शेरे उठविण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केलेली आहे. तथापि, वसना वांगणाच्या लाभक्षेत्रातील शेरे उठविण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला आहे. पुनर्वसनासाठी राखीव शेरे असलेल्या शेतकऱ्यांना देखील विभागीय आयुक्तांच्या परवानगीने शेतीचे व्यवहार करता येतात.

(३) वसना व वांगणाच्या लाभक्षेत्रातील १४५०० शेतकऱ्यांच्या ७/१२ वर इतर हक्कात पुनर्वसनासाठी राखीव असे शेरे ठेवण्यात आले होते. त्यापैकी स्लॅबपात्र नसलेल्या १४२९६ खातेदारांच्या ७/१२ पुनर्वसनासाठी राखीव असल्याचे शेरे उठविण्यात आले असून, केवळ २०४ स्लॅबपात्र खातेदारांच्या ७/१२ वर सदर शेरे ठेवण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईसह राज्यातील रेल्वे समस्यांबाबत झालेली बैठक

(३) ६५५२ (१७-०४-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सदा सरवणकर (माहिम) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह महाराष्ट्रातील संबंधित विविध समस्या व प्रश्न याकरिता दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी मा.केंद्रीय रेल्वेमंत्री व राज्याचे मा.मुख्यमंत्री, मा.परिवहन मंत्री, राज्याचे मुख्य सचिव, रेल्वे मंडळाचे अध्यक्ष, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वेच महाव्यवस्थापक व मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनचे अधिकारी तसेच विविध शासकीय विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत मंत्रालयात संयुक्त बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत राज्यातील प्रलंबित तसेच नवीन रेल्वे प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी एकात्मिक परिवहन प्राधिकरण (इंटिग्रेटेड ट्रान्सपोर्ट ॲथॉरिटी) स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राधिकरणात राज्यातील कोणत्या विभागांचा समावेश करण्यात येणार आहे वा त्याचे स्वरूप काय राहणार आहे व निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी किती कालावधी अपेक्षित आहे ?

श्री. दिवाकर रावते (१४-०७-२०१५) : (१) होय.

(२) होय, सदर बैठकीत राज्यातील प्रलंबित तसेच नवीन रेल्वे प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास कंपनी स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) महाराष्ट्र लोहमार्ग पायाभुत विकास कंपनी स्थापन करण्याकरीता राज्य शासन व रेल्वे मंत्रालय यांचे दरम्यान दिनांक २८.०६.२०१५ रोजी सामंजस्य करार स्वाक्षांकित करण्यात आला आहे. सदर कंपनीत राज्यातील सर्व विभागाच्या समावेश करण्यात येणार आहे. सदर कंपनी रेल्वे मंत्रालयाची सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी असेल.

राज्यातील मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडे कर्ज प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

(४) ७५५१ (०७-०४-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडे हजारोच्या संख्येने कर्ज प्रकरणे धुळ खात पडून असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रलंबित कर्ज प्रकरणे मोठ्या प्रमाणावर असल्याने अनेक नागरिकांना सदरहू कर्ज प्रकरणे मंजूर होण्याकरिता प्रतिक्षा करावी लागत असल्याने त्यांना नैराश्य आले आहे हे पाहता शासन आवश्यक कार्यवाही त्वरीत करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, या मागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०९-०३-२०१६) : (१) नाही.

(२) व (३) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेस अनुसरुन,

दिनांक ९ फेब्रुवारी, २०१४,

दिनांक १० फेब्रुवारी, २०१४,
दिनांक २२ मे, २०१४,
दिनांक ३ ऑगस्ट, २०१४,
दिनांकक ६ ऑगस्ट, २०१४,
दिनांक २ डिसेंबर, २०१४,
दिनांक ५ सप्टेंबर, २०१५ रोजी जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त अर्ज व त्यावरील कार्यवाही खालीलप्रमाणे:-

लाभार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या	=	७०१६४
ठरविलेली उद्दिष्टे	=	२२९४६
मंजूर झालेली अर्जाची संख्या	=	१९३९३
मंजूर करण्यात आलेली रक्कम	=	रु. १०१.१४ कोटी

याशिवाय ज्या प्रस्तावामध्ये त्रुटी आढळून आल्या होत्या, अशा लाभार्थ्यांमार्फत त्रुटींची पूर्तता करुन घेण्यात आली असून ज्या लाभार्थ्यांनी विहित वेळेमध्ये त्रुटींची पूर्तता केली नाही. अशा लाभार्थ्यांचे कर्ज प्रस्ताव महामंडळामार्फत नामंजूर करण्यात येत आहे, त्या अर्जदारांचे प्रस्ताव नामंजूर करण्यात आले आहेत. अशा काही अर्जदारांना पत्रान्वये कळविले असून उर्वरित कर्जदारांना कळविण्याची कार्यवाही महामंडळामार्फत करण्यात येत आहे.

मेहकर व लोणार तालुक्यातील (जि.बुलढाणा) शेतकऱ्यांचे ठिबक व तुषार सिंचनाचे अनुदान अदयापही थकीत असल्याबाबत

(५) ७८९१ (०४-०४-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर व लोणार तालुक्यातील (जि.बुलढाणा) शेतकऱ्यांचे ठिबक व तुषार सिंचनाचे अनुदान अदयापही थकीत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर अनुदान वाटपात अनियमितता झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच थकित शेतकऱ्यांना तातडीने अनुदान देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०९-११-२०१५) : (१) अंशत: खरे आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर व लोणार तालुक्यातील सन २०१३-१४ पर्यतचे सर्व प्रस्ताव निकाली काढण्यात आलेले आहेत, निधी अभावी सन २०१४-१५ मधील प्रस्ताव प्रलंबित आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सन २०१५-१६ या वर्षात उपलब्ध झालेला निधी सन २०१४-१५ मधील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात हरियाना, चंदीगड, मध्यप्रदेश, दिल्ली, दमन, दादरा नगर हवेली आणि गोव्यातून मोठ्या प्रमाणात बेकायदा दारूची वाहतुकीस पायबंद करणेबाबत

(६) ८२९७ (०८-०४-२०१५). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात हरियाना, चंदीगड, मध्यप्रदेश, दिल्ली, दमन, दादरा नगर हवेली आणि गोव्यातून मोठ्या प्रमाणात बेकायदा दारूची वाहतुक सातत्याने होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार राज्यात बेकायदा येणाऱ्या वाहतुकीस पायबंद करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२८-०५-२०१५) : (१) हे पूर्णत: खरे नाही. मात्र हरियाणा, चंदीगड, मध्य प्रदेश, दमण, दादरा नगर हवेली व गोवा येथून काही प्रमाणात बेकायदेशीर दारूची चोरटी वाहतूक होत असल्याचे आढळून आले आहे.
(२) व (३) होय पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागाने बेकायदा दारुची वाहतुक व विक्री करणाऱ्यावर फौजदारी गुन्हे नोंदविले आहेत. बेकायदा दारुची वाहतूक होऊ नये यासाठी पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभाग सातत्याने काम करीत आहे. बेकायदा दारुची वाहतूक होऊ नये यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत अचानक वाहन तपासणी, नाकेबंदी इत्यादी कारवाया करण्यात येतात. तसेच राज्याच्या सरहद्दीवर परिवहन, राज्य उत्पादन शुल्क व विक्रीकर विभाग यांचे एकात्मिक व संगणकीकृत सीमा तपासणी नाके उभारण्यात येत आहेत. त्यामुळे सध्याच्या मनुष्यबळासह अतिरिक्त सुविधा उपलब्ध झाल्याने बेकायदा मद्य वाहतुकीवर पायबंद घालणे आणखी शक्य झाले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

खामगांव (जि.बुलडाणा) येथील बस स्टँडचे आधुनिकीकरण करणेबाबत

(७) ८४८२ (०४-०४-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (जि.बुलडाणा) येथील बस स्टँडचे नागरीकांना बसण्याकरीता करण्यात आलेले शेड भरपूर वर्षापासूनचे जुने असल्यामुळे शिकस्त झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिवसेंदिवस प्रवाशांची संख्या वाढत असल्याने त्यांना विश्रांतीसाठी व इतर मुलभूत सुविधा बस स्थानकांवर उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रवाशांच्या सुख सोयीसाठी व महिलांसाठी वेगळे स्वच्छतागृह बांधण्याची व इतर मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी खामगांव बस स्थानकाचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, खामगांव बस स्थानकाच्या आधुनिकीकरण करण्यासाठी शासन तात्काळ मंजुरी देणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१५) : (१) हे खरे नाही.

सन १९९२ मध्ये बुलढाणा विभागांतर्गत खामगांव येथे ०९ फलाटांचे बसस्थानक बांधण्यात आले असून बसस्थानकाची इमारत सुस्थितीत अहे. प्रवाशांना बसण्यासाठी बेंचेस सुस्थितीत आहेत. बसस्थानकाच्या आवारात जुने बसस्थानकाचे शेड असून ते वापरात नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

खामगांव बसस्थानक येथे प्रवाशांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था चिरंजीलाल जांगीड यांच्या खाजगी ट्रस्ट मार्फत पाणपोई कार्यरत आहे. पुरुष व महिला प्रवाशांसाठी प्रसाधनगृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच वाहनतळास "डांबरीकरण" करण्यात आले असून ते चांगल्या स्थितीत आहे.

बसस्थानकावर वाहतूक नियत्रंक कक्ष अद्ययावत स्वरुपाचे बांधण्यात आले आहे.. बसस्थानकावर पंखे, पुरेशी लाईटची व्यवस्था करण्यात आली आहे. हिरकणी कक्ष, पोलिस चौकी, उपहारगृह, बुकस्टॉल, जनरल स्टोअर्स, दुरध्वनीकक्ष, दुध व दुग्धजन्य पदार्थाचे स्टॉल, दुचाकी वाहनतळ रसवंती गृह, केशकर्तनालय, पुरुष व महिला प्रवाशांकरिता प्रसाधनगृहाची स्वतंत्र व्यवस्था इत्यादी मुलभुत सुविधा कार्यरत आहे.
(४) बसस्थानकामध्ये पुरेशा सुविधा उपलब्ध आहेत. बसस्थानकाचे आधुनिकीकरण सध्या विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौ.आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या राज्यातील ३६ कार्यालयात कर्मचारी पुरेसे उपलब्ध करुन देण्याबाबत

(८) ८६०२ (०४-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या राज्यातील ३६ कार्यालयात एका कार्यालयासाठी ७ कर्मचारी अपेक्षित असताना केवळ १ कर्मचारी जिल्ह्याचा कारभार सांभाळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाचा कारभार कंत्राटी कामगारांच्या भरोशावर चालला आहे त्यामुळे शासकीय योजनांची अंमलबजावणी वेळेत होत नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कर्मचारी पुरेसे उपलब्ध करुन देण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) : (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही.
(३) लागू नाही.
(४) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र.मौआम-२०१२/प्र.क्र.८७/का-८,दि.१२.०६.२०१३ अन्वये महामंडळाच्या १५७ पदांच्या सुधारित आकृतिबंधास मान्यता देण्यात आली असून सदरची पदे प्रतिनियुक्ती/नियमित नियुक्त/इतरविभागात अतिरिक्त ठरलेल्या अधिकारी /कर्मचारी अथवा कंत्राटी पध्दतीने भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार मुख्यालयासाठी २५ पदे, विभागीय कार्यालयासाठी १२ पदे, जिल्हा कार्यालयासाठी १२० पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्यामध्ये जिल्हा व्यवस्थापक-३५, सहाय्यक व्यवस्थापक-३५, लिपिक-टंकलेखक-३५, शिपाई-१५ इतकी पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. महामंडळाने लिपिक-टंकलेखकाची ३३ पदे करार तत्वावर भरण्याकरिता जाहिरात दिली होती. दरम्यान सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचाऱ्यांनी सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याकरिता मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली आहे. मा.उच्च न्यायालयाने या प्रकरणी जाहिरातीस अनुसरुन भरती प्रक्रिया पूर्ण करावी व याचिकाकर्ते धारण करीत असलेली पदे भरण्याबाबत कोणतीही कार्यवाही करु नये, असे अंतरिम आदेश दिले आहेत. सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे त्यानुषंगाने महामंडळाकडून पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

तसेच महामंडळातील व्यवस्थापकीय संचालक व सहव्यवस्थापकीय संचालक या पदाचा अतिरिक्त कार्यभार अनुक्रमे अल्पसंख्याक विकास विभागातील सहसचिव व अवर सचिव यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर शहरात बंद असलेल्या डिसप्लेस्ड पर्सन कायदा (पुनर्वसन कायदा) अंतर्गत सनदा देणे काम प्रलंबित असल्याबाबत

(९) ८६१० (०४-०४-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर शहरात डिसप्लेस्ड पर्सन कायदा (पुनर्वसन कायदा) अंतर्गत सनदा देणे व त्या प्रकरणाचे काम अद्याप प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) मा.सर्वोच्च न्यायालयातील प्रकरण निकाली होवुनही प्रत्यक्ष सनदा देण्याचे काम अद्यापही सुरु नाही, हे खरे आहे काय,
(३) उल्हासनगर शहरातील उपविभागीय अधिकारी कार्यालयातुन सनदा देणे व त्या संबंधित कामे करण्याचे अद्याप सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत,
(५) शासन अशा सनदा देणे व पुनर्वसन कायदा अंतर्गत कामे पुर्ण करण्याकामी काय उपाययोजना करीत आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (२९-०५-२०१५) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) निर्वासित इसम (नु व पु.) अधिनियम १९५४ निरसित झाल्याच्या दिनांकास प्रलंबित असलेल्या प्रकरणी संबंधित प्राधिकारी निर्णय घेवू शकतात. तसेच सदर निर्णयाची अंमलबजावणी करु शकतात असा मा.सर्वोच्च न्यायालयाने दि. २८/४/२०१४ रोजी निर्णय दिला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सुचना शासन पत्र क्र. एसयुटी- २००८/प्र.क्र.५०/ र-६, दि. १७/०९/२०१४ अन्वये सर्व संबंधितांना दिल्या आहेत.

राज्यात अनेक चारचाकी वाहने बनावट क्रमांकाने धावत असल्याबाबत

(१०) ८७२८ (१०-०४-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक चारचाकी वाहने बनावट क्रमांकाने धावत असल्याबाबतची बाब माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरटीओच्या भंगारात असलेले चारचाकी वाहने विकत घेऊन त्याची दुरुस्ती करुन बनावट क्रमांकाने धावत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक चारचाकी वाहने ही दुसऱ्या राज्यातील असुन ते बनावट क्रमांकानी रस्त्यांवर धावत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या चारचाकी वाहनांमध्ये बस, ट्रॅव्हल्स, ट्रक, जीप, कार सारख्या वाहनांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्य महामार्गावर पोलीस विभागामार्फत रस्ता तपासणी मोहिम ही कडक करण्यात येणार आहे काय,
(६) नसल्यास, न करण्याची कारणे काय ?

श्री. दिवाकर रावते (२८-०८-२०१५) : (१) राज्यात काही परिवहन कार्यालयाचे कार्यक्षेत्रात काही चारचाकी वाहने बनावट नोंदणी क्रमांकावर चालत असल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(२) नाही.
(३) व (४) राज्यात बनावट क्रमांकांखाली धावत असलेल्या वाहनांपैकी काही वाहने दुसऱ्या राज्यातील असल्याचे आढळून आले आहे. या वाहनांना कार/बसेस/ट्रक इ. प्रकारच्या वाहनांचा समावेश आहे.
(५) राज्यातील सर्व क्षेत्रीय परिवहन कार्यालयांकडील वायुवेग पथकांमार्फत मोटार वाहन कायदा व त्याअंतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनाचा शोध घेण्याकरिता नियमितपणे रस्त्यावर तपासणी करुन दोषी वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येते. एप्रिल, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीत राज्यातील सर्व वायुवेग पथकांमार्फत विविध नियमांच्या उल्लंघनासाठी एकूण रु. ४०६.६१ कोटी एवढा तर एप्रिल, २०१५ ते जून, २०१५ या कालावधीत एकूण रु. ८२.१६ कोटी एवढा दंड वसूल करण्यात आला.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

खडकवासला (जि.पुणे) न हे आंबेगाव परिसरात सहामजली इमारत कोसळून तरुणाचा झालेला मृत्यू

(११) ९१५७ (०८-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला मतदार संघातील (जि.पुणे) न हे आंबेगाव परिसरात सहा मजली इमारत कोसळून एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या इमातीचे काही मजले अनधिकृत असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी पोलीस विभागा मार्फत सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय व त्याची सदयस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२९-०२-२०१६) : (१) व (२) होय.
(३) याबाबत सिंहगड रोड पोलीस ठाणे शहर गु.र. नं. ८२/२०१४ महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम सन १९६६ चे कलम ५२ तसेच भा.दं.वि. कलम ३०४,३०८,४२७,३४ तसेच ४६५,४६८,४७१,४२०,१२०(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासाअंती मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट क्र. ८ शिवाजीनगर, पुणे यांचे कोर्टात आर.सी.सी.क्र. ०४०००५७३/१५ अन्वये दि. २.२.२०१५ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

संगमेश्वर (जि.रत्नागिरी) राज्य परिवहन महामंडळाच्या देवरुख आगारातील विविध विभागामंधील ५५ पदे रिक्त असल्याबाबत

(१२) ९३७२ (०४-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) राज्य परिवहन महामंडळाच्या देवरुख आगारातील विविध विभागामंधील ५५ पदे रिक्त असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) तदनूसार सदर पदे तात्काळ भरण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

श्री. दिवाकर रावते (३०-०७-२०१५) : (१), (२) व (३) माहे जानेवारी, २०१५ मध्ये देवरुख आगारात १० कार्यशाळा कर्मचारी व वाहतूक प्रवर्गातील ३२ अशी एकूण ४२ पदे रिक्त आहेत. खात्यामार्फत बढतीद्वारे व सरळसेवा भरतीद्वारे रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून सरळसेवा भरती अंतर्गत रत्नागिरी विभागात २३१ चालक (कनिष्ठ) पदांची भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. चालक (कनिष्ठ) पदातील ६२ व सहाय्यक (कनिष्ठ) पदातील २५ उमेदवारांचे प्रशिक्षण सुरु असून प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सहाय्यक पदातील रिक्त जागी नेमणूका देण्यात कार्यवाही राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यातील काही भागात नुकसानग्रस्त शेतक-यांना मदत करण्याबाबत

(१३) ९५३१ (०४-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यातील काही भागात माहे नोव्हेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या वादळी पावसामुळे संपूर्ण धान पिकांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नुकसानीची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीनुसार या नुकसानग्रस्त शेतक-यांना कोणत्या प्रकारची मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२९-०२-२०१६) : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारा-गोंदियासारख्या आदिवासी बहुल जिल्हयातील ग्रामीण भागात परिवहन महामंडळाच्या बसचे प्रवास भाडे कमी करून शेतक-यांना एस.टी.च्या प्रवासात सवलत देण्याबाबत

(१४) ९७५३ (०४-०४-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पेट्रोल-डिझेलसारख्या इंधनाचे दर कमी झाले असले तरी रेल्वेच्या तुलनेत परिवहन महामंडळाच्या एसटीचे भाडे तीन पटीने अधिक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भंडारा-गोंदियासारख्या आदिवासी बहुल जिल्हयातील ग्रामीण भागातील गरीब शेतक-यांना आधीच निसर्ग दगा देत असताना मात्र परिवहन महामंडळाचे एसटीचे भाडे कमी करणे, तसेच शेतक-यांच्या एस.टी.च्या प्रवासात सवलत देण्याची मागणी शेतकरी व नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहे,
(३) असल्यास, ग्रामीण भागातील शेतकरी व नागरिकांची मागणी लक्षात घेता, परिवहन महामंडळाच्या बसचे प्रवास भाडे कमी करून शेतक-यांना एस.टी.च्या प्रवासात सवलत देण्यासंबंधी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२०-०८-२०१५) : (१), (२) व (३) रा.प.महामंडळाने कामगार करार सन २०१२-१६ करीता सन २०१२-१३ मध्ये रु.५७७.५४ कोटी, सन २०१३-१४ मध्ये रु. ४६२.२९ कोटी, सन २०१४-१५ मध्ये रु.५०४.८१ कोटीचा आर्थिकभार महामंडळावर आहे. महामंडळास सन २०१२-१३ मध्ये रु. ४२८.८३ कोटी, १३-१४ मध्ये रु. ५७२.६५ कोटी व १४-१५ (फेब्रुवारी, २०१५ अखेर) अंदाजित रु. ६४५.०८ कोटी इतका तोटा झालेला आहे. त्या तुलनेत डिझेल दर कमी झाल्याची बचत रु. १९१ कोटी इतकी आहे.

रा.प.महामंडळाचे तिकीट दर हे प्रति टप्प्यानुसार ६ कि.मी. चा १ टप्पा गृहीत धरुन आकारण्यात येतो रा.प.महामंडळाची तिकीट आकारणी पध्दत व प्रवासी वाहून नेण्याची क्षमता रेल्वेपेक्षा संपूर्णत: वेगळी असल्याने रा.प.महामंडळाच्या भाडे दराची तुलना रेल्वेच्या दराशी करणे संयुक्तिक नाही.

शेतकऱ्यांना प्रवास भाड्यात सवलत मिळणेबाबत रा.प.महामंडळाला प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. राज्य परिवहन महामंडळाकडील प्रवासी सवलतींसदर्भात दि.१०.२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेतला असून संबंधित प्रशासकीय विभागाने सवलतीच्या मुल्यांची राज्य परिवहन महामंडळकडे प्रतिपूर्ती करण्याच्या अटीच्या अधिन राहून प्रवास सवलत राज्य परिवहन महामंडळाद्वारे राबविण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उमरागा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) दाळिंब-नारंगवाडी-माडज येथील बसथांब्याची दुरवस्था झालेबाबत व सदरच्या बसथांब्याची दुरूस्ती करणेबाबत

(१५) ९९६२ (०७-०४-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरागा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) दाळिंब-नारंगवाडी-माडज येथील बसथांब्याची दुरवस्था झालेबाबत व सदरच्या बसथांब्याची दुरूस्ती करणेबाबत उमरगा-लोहारा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २९ ऑगस्ट, २०१२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२९-०८-२०१५) : (१) हे खरे आहे.

(२) दाळींब येथील प्रवासी निवारा महामार्गाच्या रुंदीकरणात बाधीत होत असून महामार्गाच्या रुंदीकरणानंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत आवश्यक तेथे प्रवासी निवारा उभारण्याकरीता विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, उस्मानाबाद यांचेकडून पाठपुरावा सुरु आहे.

नारंगवाडी येथील प्रवाशी निवाऱ्यांची जानेवारी, २०१५ मध्ये डागडुज्जी करण्यात आलेली आहे. माडज येथील प्रवाशी निवाऱ्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. महामंडळाची आर्थिक स्थिती पाहता स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत प्रवासी निवाऱ्याची दुरुस्ती करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावरुन पाठपुरवा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

उमरगा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) उमरगा-येणेगूर व मुरूम येथील बसस्थानकांच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

(१६) ९९६३ (०७-०४-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) उमरगा -येणेगूर व मुरूम येथील बसस्थानकांच्या इमारतीची दुरवस्था झालेल्या कारणाने व बसस्थानकात पाणी, वीज, रस्ते, आदि सुविधांचा अभाव असलेल्या कारणाने प्रवाशांची गैरसोय होत असलेबाबत व सदरच्या बसस्थानकांची दुरूस्ती करणेबाबत उमरगा- लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दि. २९/८/१२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे विंनती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, कारवाईस होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२४-०८-२०१५) : (१) व (२) उमरगा येथील बसस्थनक ७ फलाटांचे असून स्थानिक स्वराज्य संस्थेकडून अपुरा पाणी पुरवठा होत असल्याने बसस्थानकावर टँकरद्वारे प्रवाशांना पिण्यासाठी पुरेसा पाठी पुरवठा केला जातो. वाहनतळाची डांबरीकरणाने डागडुजी करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे.

येणेगुर हे बसस्थानक हे ३ फलाटांचे असून स्थानिक स्वराज्य संस्थेकडून अपुरा पाणी पुरवठा होत असल्याने बसस्थानकावर टँकरद्वारे प्रवाशांना पिण्यासाठी पुरेसा पाणी पुरवठा केला जातो. बसस्थानकावर विद्युत व्यवस्था आहे. बसस्थानकाच्या कठीणीकरण असलेला वाहनतळ दुरुस्त करण्यात आला आहे. बसस्थानाकाच्या किरकोळ दुरुस्ती व रंगरंगोटी करण्याची कार्यवाही राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.

मुरुम हे बसस्थानक २ फलाटांचे असून स्थानिक स्वराज्य संस्थेकडून अपुरा पाणी पुरवठा होत असल्याने बसस्थानकावर टँकरद्वारे प्रवाशांना पिण्यासाठी पुरेसा पाणी पुरवठा केला जातो. बसस्थानकावर विद्युत व्यवस्था आहे. डांबरीकरण असलेला वाहनतळ सुस्थितीत आहे.

वरील तीनही बसस्थानकावर प्रवाशांसाठी चौकशी कक्ष, तिकिट आरक्षण, स्त्री/पुरुष स्वतंत्र प्रसाधनगृहाची, विद्यार्थी पासेस इ. व्यवस्था पुरविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शेगांव - खामगांव - जालना रेल्वे मार्गाचे कामासाठी राज्य शासनाने ५० टक्के सहभाग देण्याबाबत

(१७) १०३७५ (०६-०४-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रेल्वे मार्ग पुर्ण करण्यासाठी राज्य शासन ज्या रेल्वे प्रकल्पांना खर्चाच्या ५० टक्के अथवा जास्त सहभाग देण्यास सहमती देईल, ते प्रकल्प भारतीय रेल्वे तीन वर्षात पुर्ण करण्याचा प्रयत्न करेल असे केंद्र शासनाने कळविल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये अथवा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,राज्य शासनाने बुलडाणा जिल्ह्यातील शेगांव - खामगांव - जालना रेल्वे प्रकल्पाचे काम करण्याचे हाती घेतल्यास बुलडाणा अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांनी १०० कोटी रुपयाचे कर्ज शासनाला देण्यात येईल असे पत्र मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ७ नोव्हेंबर, २०१३ ला दिले, हे ही खरे आहे काय,

(३) राज्य शासनाने शेगांव - खामगांव - जालना रेल्वे प्रकल्पासाठी राज्य शासन ५० टक्के सहभाग देण्याचा निर्णय घेणार आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (१८-०२-२०१६) : (१) हे अंशत: खरे आहे, अशा स्वरुपाचा प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडून शासनास सन २००९ मध्ये प्राप्त झाला होता.

(२) अशा स्वरुपाचे पत्र अद्यापपर्यंत शासनास प्राप्त झालेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

वसनी मध्यम प्रकल्पातील बोरगांव (तळणी) या गावाच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव विशेष बाब म्हणून मंजूरी देण्याबाबत

(१८) १०४९१ (०४-०४-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसनी मध्यम प्रकल्पातील बोरगांव (तळणी) या गावाच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव विशेष बाब म्हणून मंजूरी देण्याकरीता मा.विभागीय आयुक्त अमरावती यांचेकडून पुनर्वसन मंत्रालयाकडे पाठविण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, कार्यवाही प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०७-०१-२०१६) : (१) होय.
(२) बोरगाव (तळणी) या गावाचे पुनर्वसन प्रस्तावास शासनाने दिनांक २०/०८/२०१५ च्या शासन निर्णयान्वये विशेष बाब म्हणून मान्यता दिलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरात कार्ड रीडर मशीनची होत असलेली कमतरता

(१९) १०८८४ (०४-०४-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात वाहन चालविणाऱ्या १३ लाख वाहन चालकांकडे असणारे स्मार्ट कार्ड लाईसन्स अस्सल वा बनावट आहे याची सत्यता पडताळून पाहण्यासाठी पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे फक्त दोन कार्ड रीडर मशीन उपलब्ध असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे दोन कार्ड रीडर मशीन खटला विभागाकडे असल्याने रस्त्यावर फिरणाऱ्या भरारी पथकांना वाहन चालकांच्या स्मार्ट कार्डची जागेवर तपासणी करता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बाबीचा शासन गांभीर्याने विचार करुन आणखी कार्ड रीडर मशीन घेणार आहेत काय,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०७-०९-२०१५) : (१) प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्याकडे ४ कार्ड रिडर मशीन उपलब्ध आहेत.

(२) होय.

(३) व (४) रीडर यंत्राऐवजी मोबाईल फोनचा वापर करुन नोंदणीपत्र/अनुज्ञप्तीची सत्यता तपासण्याची सुविधा उपलब्ध करण्याची बाब राष्ट्रीय सुचना केंद्र यांच्यामार्फत कार्यावाही खाली आहे.

पुणे शहरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयात वेळेत होत नसल्यामुळे वाहन नोंदणी पुस्तके व विविध परवाने अर्ज मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याबाबत

(२०) १०८९० (०७-०४-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयात कामे वेळेत होत नसल्यामुळे वाहन नोंदणी पुस्तके व विविध परवाने अर्ज मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याची बाब जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचारी संख्या वाढविणे व नागरिकांची कामे विहित वेळेत होण्यासाठी काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०७-०९-२०१५) : (१) होय हे खरे आहे.

जानेवारी, २०१५ मध्ये अशी बाब निदर्शनास आली होती. तथापि, आता अशी परिस्थिती नसून वाहन नोंदणीचे काम सुरळीत चालू आहे.

(२) व (३) प्रादेशिक परिवहन कार्यालयात कर्मचारी नियुक्ती करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे. त्याचप्रमाणे वाहन नोंदणी प्रमाणपत्र स्मार्ट कार्डमध्ये जारी करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत.

औसा तालुक्यात ठिंबक व तुषार संचसाठीचे अनुदान तातडीने अदा करण्याबाबत

(२१) १०९३६ (०४-०४-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजनेंतर्गत ठिंबक व तुषार संचसाठीचे सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या वर्षाचे अनुदान औसा विधानसभा मतदार संघातील सुमारे २००० हून अधिक शेतक-यांना आजमितीस मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेंतर्गत लाभार्थींना अनुदान प्रत्यक्षात वितरीत करण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) सदरहू शेतक-यांना केंद्र पुरस्कृत सूक्ष्म अंतर्गत ठिंबक व तुषार संचासाठीचे अनुदान लवकरात लवकर अदा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस कारवाई केली आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (१६-०६-२०१५) : (१) अंशतः खरे आहे.

औसा तालुक्यात सन २०१२-१३ मधीन १०, सन २०१३-१४ मधील १४३८ व सन २०१४-१५ मधील १०७ असे एकूण १५५५ शेतक-यांचे सुक्ष्म सिंचन संचाचे अनुदान वितरीत केलेले नाही.

(२) व (३) सन २०१२-१३ मधील अनुदानाच्या वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

केंद्र शासनाकडून सन २०१३-१४ या वर्षासाठी प्राप्त झालेला निधी सन २०१२-१३ मधील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी वापरण्यात आल्याने सन २०१३-१४ साठी निधी उपलब्ध होऊ शकला नाही. त्यामुळे सन २०१३-१४ मध्ये सुक्ष्म सिचंनाचे प्रस्ताव स्विकारण्यात आले नाहीत. तथापि, सन २०१३-१४ मध्ये ज्या शेतक-यांनी सुक्ष्म सिंचन संच बसविले त्यांचे प्रस्ताव स्विकारुन त्यांना अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार शेतक-यांकडून प्रस्ताव स्विकारण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर शेतकऱ्यांना लवकर अनुदान वाटप करण्यात येईल.

सन २०१४-१५ या वर्षासाठी द्यावयाच्या अनुदानासाठी राज्य हिश्श्याच्या अनुदानानाचे जिल्हा स्तरावर जिल्हा विकास निधीमधून (DPDC) निधी उपलब्ध होणारे नसल्याने १०७ शेतक-यांचे अनुदानाची मागणी केलेली आहे. जिल्हा नियोजन समितीकडून अनुदान प्राप्त होताच. शेतक-यांना अदुदानाचे वाटप करण्यात येईल.

पुणे जिल्ह्यातील वीर आणि उजनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वनजमिनी व पुनर्वसन शेरा असलेल्या जमिनी देण्यात आल्याबाबत

(२२) १०९६६ (०७-०४-२०१५). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील वीर आणि उजनी प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या मालकी हक्काच्या जमिनी शासनाने संपादित केल्या मात्र या शेतकऱ्यांना वनजमिनीवर पुनर्वसन शेरा असलेल्या जमिनी देण्यात आल्याने सदर शेतकऱ्यांना जमिनी खरेदी करता येत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांना स्वमालकीच्या व जमिनीची खरेदी विक्री करता यावी म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६) : (१) व (२) होय, वीर व उजनी प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना दिनांक ३१.१०.१९६९ च्या शासन निर्णयानुसार दौंड व इंदापूर तालुक्यातील वन जमिनीमधील क्षेत्र वाटप करण्यात आलेले आहे. वाटप करण्यात आलेली जमीन नवीन शर्तीवर मंजूर करण्यात आली होती. वन जमिनीचे निर्वनीकरण करण्याबाबतचा एकत्रित प्रस्ताव तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

जायकवाडी धरणग्रस्तांना जमिनीचे वाटप करणेबाबत व पुनर्वसित गावांना विकास निधी देणेबाबत

(२३) १०९७४ (०४-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी प्रकल्पा अंतर्गत प्रकल्पग्रस्तांना जमिनीचे वाटपाबाबत मा.मंत्री मदत व पुनर्वसन यांचेकडे दिनांक ११ डिसेंबर, २०१४ ला बैठक घेऊन जमिनी वाटपाबाबत तातडीने कार्यवाहीचे आदेश मंत्री महोदयांनी मंत्रालयात मा.विधानसभा सदस्यांचे बैठकीत दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणी आतापर्यंत प्रकल्पग्रस्तांना जमिनीचे वाटप केले वा पुनर्वसित गावाचे विकासासाठी निधी इेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०८-०७-२०१५) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य परिवहन महामंडळाच्या प्रकल्पात स्मार्ट कार्ड देण्याबाबत

(२४) ११२३२ (०४-०४-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या प्रकल्पात स्मार्ट कार्ड देण्याबाबत योजनेचा सन २०११ मध्ये प्रारंभ करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही योजना डिसेंबर, २०११ मध्ये सुरु करण्यात आलेली योजना जळगांव विभागात माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये सुरु झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, साधारण अडीच-तीन वर्षे उशिराने पोहचलेल्या योजनेअंतर्गत सुरुवातीच्या टप्प्यात देखील कार्डचा पुरवठा कमी झाल्याने केवळ आठ हजार विद्यार्थ्यांनाच कार्डचे वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सद्य:स्थितीत कागदी पासचे वाटप करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, स्मार्ट कार्डस पुरवठ्यात वाढ करुन जळगाव जिल्ह्यात सर्व लाभार्थ्यांना लाभ देण्याचे शासनाचे विचाराधीन आहे काय ?

श्री. दिवाकर रावते (२९-०८-२०१५) : (१) ते (५) सदरची योजना राबविण्याची राज्य परिवहन जळगाव विभागात दि. १२.२.२०१४ पर्यंत ८,९९५ स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले होते. विद्यार्थ्यांची संख्या पाहता स्मार्ट कार्डचा पुरवठा कमी असल्याने स्मार्ट कार्डबरोबर कागदी पासेसचे वितरण करण्यात येत आहे.

दिनांक ०४.०८.२०१५ पर्यंत जळगांव विभागात ''पी टाईप'' स्मार्ट कार्ड संख्या ५८,३८८ आणि ''टी टाईप'' स्मार्ट कार्डची संख्या १०, १९४ इतक्या स्मार्ट कार्डचा पुरवठा करण्यात आला आहे.

अहमदपुर तालुक्यात (जि.लातुर) मोठ्या प्रमाणावर दुष्काळाची स्थिती निर्माण झाल्याबाबत

(२५) ११४२८ (०४-०४-२०१५). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपुर तालुक्यात (जि.लातुर) मोठ्या प्रमाणावर दुष्काळाची स्थिती निर्माण झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान स्पष्ट झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात सरासरीपेक्षा निम्म्याहून कमी पाऊस पडल्यामुळे खरीप व रब्बी य दोन्ही हंगामात शेतक-यांना पिक घेता आले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दुष्काळी स्थितीमुळे या भागात जनावरांचा चारा तसेच पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन या भागातील दुष्काग्रस्तांना दिलासा देण्यासाठी काय उपाययोजना केली आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (०३-०९-२०१५) : (१) शासन निर्णय दि. २५.११.२०१४ अन्वये लातूर जिल्हयातील सर्व ९४३ गावे टंचाईग्रस्त गावे म्हणून घोषित करण्यात आली आहेत.

(२) लातूर जिल्हयामध्ये एकूण ६,०७,९८४ हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची व १,१२,१७० हेक्टर क्षेत्रावर रब्बी पिकांची पेरणी करण्यात आली. तथापि, कमी पर्जन्यमानामुळे पिक पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आली आहे.

(३) व (४) पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावराच्या चाऱ्याचा प्रश्न विचारात घेऊन सदर भागाकरिता टंचाई निवारणार्थ रु. ३८९.९८ लक्ष रकमेचा टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला. तद्नुषंगाने जनावरांसाठी चारा उपलब्ध करणे आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे इत्यादी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

प्रचलित पैसेवारी (आणेवारी) पध्दतीचा पुर्नविचार करण्याबाबत

(२६) ११५२८ (०७-०४-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रचलित पैसेवारी (आणेवारी) पध्दतीचा पुर्नविचार करुन केंद्र शासनाच्या धोरणाच्या अनुषंगाने अभ्यास करुन पैसेवारी (आणेवारी) पध्दतीत बदल घडवून आणण्याचे धोरण शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत राज्य शासनाने दिनांक ४ एप्रिल, २०१३ च्या शासन निर्णयानुसार अभ्यास समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात अभ्यास समितीच्या किती बैठका झाल्या व समिती निष्कर्षापर्यंत पोहोचली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय याबाबत शासनाची भुमिका काय आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (१५-०६-२०१५) : (१) होय.
(२) होय.
दि. ०६ एप्रिल, २०१३ च्या शासन निर्णयानुसान समिती गठित केली आहे.
(३) समितीच्या नऊ बैठका संपन्न झाल्या असून समितीचा अहवाल अंतीम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

घनसांवगी तालुक्यात (जि.जालना) अल्पसंख्याक मुलींसाठी सुसज्ज वसतिगृह एक वर्षापासून बांधून पूर्ण झाले आहे तथापि अद्याप वापर करण्यात येत नसल्याबाबत

(२७) ११५५० (०७-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घनसांवगी तालुक्यात (जि.जालना) अल्पसंख्याक मुलींसाठी सुसज्ज वसतिगृह एक वर्षापासून बांधून पूर्ण झाले आहे तथापि अद्याप वापर करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच सदर वसतिगृहाचा वापर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) : (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली असून आतापर्यंत ४३ विद्यार्थीनींचे प्रवेश निश्चित करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बुलडाणा जिल्हा अल्पसंख्यांक मुलींचे मंजूर वसतीगृहाचे बांधकाम त्वरीत सुरु करणेबाबत

(२८) ११५८४ (०८-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्हा अल्पसंख्यांक मुलींचे वसतीगृह मंजूर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त अल्पसंख्यांक मुलीचे वसतीगृहाचे बांधकामास अद्याप सुरुवात झालेली नाही, हे खरे आहे काय,
(३) उपरोक्त प्रलंबित अल्पसंख्यांक मुलींचे वस्तीगृहाचे बांधकाम त्वरीत सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०२-०८-२०१५) : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

समुद्रपूर तालुक्यातील (जि.वर्धा) डोंगरगांव, महागाव व जवळपास २० ते २५ गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित असल्याबाबत

(२९) १२७७९ (०८-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समुद्रपूर तालुक्यातील (जि.वर्धा) डोंगरगांव, महागाव व जवळपास २० ते २५ गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित असल्याचे डिसेंबर, २०१४ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गांव पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाचीकारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२०-०२-२०१६) : (१) हे खरे आहे.
(२) मौजा. डोंगरगाव येथे पुरग्रस्त पुनर्वसन अंतर्गत सात नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. तसेच मौजा महागाव येथे नागरी सुविधा पुरविण्याबाबतचा लाल नाला व पोथरा नाला प्रकल्पांतर्गत पुनर्वसीत गावठाणात महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ चे तरतूदीनुसार देय नागरी सुविधा या पुर्वीच पुरवण्यात आलेल्या आहेत. सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर यांना कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

आकोट (जि.अकोला) वान धरणातून ८४ खेडीगावात पाणीपुरवठा जलवाहिनी फुटल्याने स्थानिक शेतक-यांच्या लिंबु व हरभरा पिकाच्या नुकसानी बाबत

(३०) १२७८५ (०७-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आकोट (जि.अकोला) येथील माहे डिसेंबर व जानेवारी २०१४-२०१५ वा त्या सुमारास वान धरणातून पाणी पुरवठा जलवाहिनी फुटल्याने स्थानिक शेतक-यांच्या शेतात मोठया प्रमाणात पाणी शिरल्याने लिंबु बाग व हरभरा पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी सदर नुकसानग्रस्त शेतक-यांच्या तक्रारीवर तहसिलदार आकोट यांनी काय कारवाई केली, अथवा कारवाईचा तपाशिल काय आहे,

(३) याप्रकरणी, नुकसानग्रस्त शेतक-यांच्या शेताचे संबंधित अधिका-यांनी तातडीने दखल घेऊन घटनास्थळाचे पंचनामे व नुकसानी अहवाल तयार केला आहे,
(४) असल्यास, भरपाई देण्यासंबंधी कोणत्या स्वरुपाची कारवाई केली, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२९-०२-२०१६) : (१) होय.
(२), (३), (४) व (५) वान धरणाची पाणी पुरवठा जलवाहिनी फुटल्याने स्थानिक शेतकऱ्याने तहसिलदार, अकोट यांच्याकडे दि. १७.१२.२०१५ रोजी तक्रार अर्ज केला होता. त्यानुसार संबंधित तलाठी यांनी नुकसानीचे पंचनामे करुन दि. २२.१२.२०१४ रोजी अहवाल सादर केला.

उपरोक्त नुकसान भरपाई संदर्भात कार्यकारी अभियंता, जल व्यवस्थापन मंडळ, यवतमाळ यांना तहसिलदार, अकोट यांनी दि. २.१.२०१५ रोजी पत्राने कळविले आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम व कळंब तालुक्याची विभागणी करुन वाशी तालुक्याची निर्मिती करण्याबाबत

(३१) १५५१२ (०७-०४-२०१५). श्री.राहुल मोटे (परांडा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम व कळंब तालुक्याची विभागणी करुन वाशी तालुक्याची निर्मिती करण्यात आली असता भूम व कळंब तालुके अवर्षण प्रवण क्षेत्रविकास कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आले असून वाशी या तालुक्याचा समावेश करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास वाशी तालुका हा कळंब व भूम तालुक्यातील गावाचाच असल्याने सदर तालुका अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रमांत समाविष्ट करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-०२-२०१६) : (१), (२) व (३) उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम व कळंब तालुक्याची विभागणी करुन वाशी तालुक्याची निर्मिती करण्यात आली आहे. तत्पुर्वी भूम व कळंब तालुक्यातील सर्व गावे अवर्षण प्रवण क्षेत्र कार्याक्रमामध्ये समाविष्ट असल्याने नवनिर्मिती वाशी तालुक्यातील सर्व गावांचा समावेशअवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रमामध्ये झालेला आहे. परंतु केंद्र शासनाच्या अवर्षण प्रवण क्षेत्र कार्याक्रमांतर्गत समाविष्ट असलेल्या तालुक्याच्या यादीमध्ये नवनिर्मिती वाशी तालुक्याचा समावेश नाही, हे खरे आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वक्फ मंडळाच्या जमिनीच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

(३२) १६५९२ (०८-०९-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **औकाफ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वक्फ मंडळाच्या जमिनीच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मा.माजी न्यायमुती श्री.शेख यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी आयोग नेमण्यात आला असून सदरच्या चौकशी आयोगाने आपला अहवाल दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास विधानसभा सभागृहात सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयोगाने अहवालात केलेल्या शिफारशीची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने तसेच राज्यातील वक्फ मंडळाच्या जमिनीच्या गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२७-१०-२०१५) : (१) होय,

(२) श्री.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाने सादर केलेला अहवाल व त्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीचा कृती अहवाल दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेला आहे. सदर कृती अहवालात नमूद केल्यानुसार वक्फ जमिनीवरील अतिक्रमणे दूर करण्याच्या व इतर गैरकृती, बेकायदेशीर कारवाया रद्द करुन संबंधित वक्फ मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियमातील तरतूदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याचे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला निदेश देण्यात आलेले आहेत. सदर कामी मंडळाला सहाय्य करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली, १ उप जिल्हाधिकारी, २ तहसिलदार व २ नायब तहसीलदार संवर्गातील अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या एका कृतीदलाची तीन वर्षाच्या कालावधीकरिता नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे. आयोगाने त्यांच्या अहवालात केलेल्या काही शिफारशींचा विषय महसूल व वन विभाग, सामान्य प्रशासन विभाग, विधी व न्याय विभाग तसेच कृषि विभाग यांच्याशी संबंधित असल्याने आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्याविषयी संबंधित विभागाला कळविण्यात आले आहे. तसेच वक्फ अधिनियमातील तरतुदीनुसार राज्यातील वक्फ मालमत्तांचे दुसरे सर्वेक्षण करण्यासाठी सर्वेक्षण आयुक्तांची नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागातील ३५ अधिकाऱ्यासह ५५ पदे रिक्त असल्याबाबत

(३३) १६६७७ (११-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागातील ३५ अधिकाऱ्यासह ५५ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे उत्पादन शुल्काची वसूली पूर्णपणे होत नसल्याने शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असून जिल्ह्यात कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कामाचा ताण पडत असल्याने सदर रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२२-०९-२०१५) : (१), (२) व (३) सोलापूर जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाकरीता मंजूर १५३ पदांपैकी १०२ पदे भरलेली असून ५१ पदे रिक्त आहेत.

उपलब्ध कर्मचाऱ्यांचा वापर करुन उत्पादन शुल्क वसूलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे. तथापि, या कर्मचाऱ्यांवर पडणारा कामाचा ताण विचारात घेऊन रिक्त पदे भरण्याची कार्यवाही ताताडीने करण्यात येत आहे.

मंगळवेढा तालुक्याचा अल्पसंख्यांक ग्रामीण बहुल क्षेत्र विकास योजनेअंतर्गत समावेश करण्याबाबत

(३४) १६७०५ (१७-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील ८३ पैकी ३० गावांमध्ये अल्पसंख्याकांची लोकसंख्या असताना देखील प्रशासनाने चुकीची व मोघम आकडेवारी दिल्याने मंगळवेढा तालुक्याला अल्पसंख्यांक ग्रामीण बहुल क्षेत्र विकास योजनेतून वगळण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंगळवेढा तालुक्याचा अल्पसंख्यांक ग्रामीण बहुल क्षेत्र विकास योजनेअंतर्गत समावेश करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२७-१०-२०१५) : (१) नाही,

अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रम ही योजना सन २००१ च्या जनगणनेनुसार मुंबई शहर व मुंबई उपनगर हे जिल्हे वगळता राज्यातील उर्वरित जिल्ह्यांतील ४४० ग्रामपंचायतींची तालुकानिहाय उदिष्ट या निकषावर राबविण्यात येते. यानुसार जिल्हा सोलापूरची अल्पसंख्यांक लोकसंख्या १,८५,४६१ असून मंगळवेढा तालुक्याची अल्पसंख्यांक

लोकसंख्या ६,८७५ (०.१०%) इतकी आहे. ज्या ग्रामपंचायतीतील अल्पसंख्याकांची लोकसंख्या कमीत कमी १०० किंवा अधिक आहे अशा ग्रामपंचायती निकषानुसार अनुदान मिळण्यास पात्र आहेत. त्यायोगे मंगळवेढा तालुक्याची निवड होऊ शकली नाही.

(२) व (३) सन २०११ च्या जनगणनेचा अल्पसंख्यांक लोकसंख्येचा अहवाल प्राप्त झाला आहे. सोलापूर व मंगळवेढा तालुक्यातील अल्पसंख्यांक समुहाची लोकसंख्या विचारात घेऊन विहीत निकषानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

धर्माबाद (ता.जि.नांदेड) येथील फुले नगरच्या पाठीमागील नविन तहसिल समोरील सर्वे नंबर १६० ए / बी या जागेवर ताबा केला असल्याबाबत

(३५) १६९५४ (०६-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद (ता.जि.नांदेड) येथील फुले नगरच्या पाठीमागील नविन तहसिल समोरील सर्वे नंबर १६० ए / बी या जागेवर येथील रहिवाशी असलेले राजू शेट्टी यांनी औकाफ बोर्डाच्या जागेवर अतिक्रमण केले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जमीन ही पिरबाबू महेबुब शहा यांच्या नावे होती त्यांच्या निधनानंतर या सर्वेमधील ही इनामी जमीन ही औकाफ बोर्डाच्या स्वाधीन करण्यात आली व तदनंतर औकाफ बोर्डाने मुळ मालक यांच्या वारसांना ही जमीन देण्याची मागणी केली असून राजू शेट्टी यांनी या जागेवर अनधिकृतरित्या ताबा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) चौकशीअंती शासनाने मुळ मालकांच्या वारसांना जमिन देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०७-१२-२०१५) : (१) नाही.

(२) नाही.

(३) होय. अतिक्रमण दिसून आले नाही.

(४) सदरील जमीन दिनांक ३०.३.२०१५ रोजी वक्फ बोर्डाचे प्रतिनिधींच्या ताब्यात दिली असल्याचा अहवाल उपजिल्हाधिकारी (सामान्य), नांदेड यांनी त्याच्या दिनांक २८.१०.२०१५ च्या पत्रान्वये सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा जिल्ह्यातील वेणेखाले ग्रामस्थांच्या जमिनीवर उरमोडी हे धरण उभारण्यात आले परंतू १८ वर्षानंतरही या प्रकल्पबाधीत कुटूंबाचे पुनर्वसन न झाल्याबाबत

(३६) १७०२४ (१४-०८-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील वेणेखाले ग्रामस्थांच्या १० हेक्टर जमिनीवर १८ वर्षापुर्वी उरमोडी हे धरण उभारण्यात आले परंतू १८ वर्षानंतरही या प्रकल्पबाधीत कुटूंबाचे शासनाने पुनर्वसन केले नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरमोडी धरणासाठी संपादित केलेल्या ग्रामस्थांचे पुनर्वसन म्हसवड येथे करण्यात यावे अशी मागणी सतत १८ वर्षे करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत ग्रामस्थांनी आपल्या कुटुंबासह आमरण उपोषण करण्याचा निर्णय शासनाला माहे एप्रिल, २०१५ मध्ये दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामस्थांच्या न्याय मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०१-०३-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.

उरमोडी धरणासाठी वेणेखोल येथील ग्रामस्थांची २५.७१ हे.जमीन संपादीत करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) वेणेखोल गावाच पुनर्वसन म्हसवड येथे करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत होती. त्या मागणीसाठी प्रकल्पग्रस्तांनी माहे एप्रिल, २०१५ मध्ये आंदोलनाचा इशारा दिला होता. दिनांक ०९.८.२०१५ रोजीच्या आदेशान्वये वेणेखोल पुनर्वसनाच्या मुळ नियोजनात बदल करुन मौजे म्हसवड येथे पुनर्वसन करण्यास मान्यता देण्यात आली असून त्यानुसार १३९.५४ हे. आर जमिन संपादनाची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरिता अल्पसंख्याक ग्रामीण क्षेत्रात सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

(३७) १७२५८ (१४-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरिता अल्पसंख्याक ग्रामीण क्षेत्रात मुलभुत /पायाभूत सुविध उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने शा.नि.क्र. अविवि २०१४/प्र.क्र.५१/१४/का-१७ दिनांक २१ जून, २०१४ अन्वये प्रस्ताव मागीतले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी वाशिम यांनी वाशिम जिल्ह्यातील १३ ग्रामपंचायतीचे प्रस्ताव २०१५ च्या दरम्यान शासनाकडे मान्यतेसाठी पाठविले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, मान्यता न देणेबाबतची कारणे काय,
(५) याबाबत, शासनाची स्पष्ट भुमिका काय ?

श्री. एकनाथराव खडसे (२७-१०-२०१५) : (१) होय,
(२) होय,
(३), (४) व (५) शासन निर्णय क्र. अविवि २०१४/ प्र.क्र. ५१/१४/का-७ अल्पसंख्यांक विकास विभाग दिनांक २१ जून, २०१४, अन्वये दिनांक १ सप्टेंबर, २०१४ पर्यंत अल्पसंख्यांक बहुल ग्रामपंचायतीचे परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी, वाशिम यांच्या मान्यतेने शासनास सादर करणे अपेक्षित होते,

जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडून दिनांक १३ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनास १३ ग्रामपंचायतींचा प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. नियोजन व वित्त विभागाकडून सदर प्रस्तावाला ३१ मार्च, २०१५ अखरे मान्यता मिळाली नाही.

सन २०१५-१६ वर्षामध्ये सदर योजना राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. यबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर, त्यानुसार राज्यात सर्व जिल्ह्यातील अल्पसंख्यांक बहुल ग्रामपंचायतींना अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यासाठी संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात येतील.

पुणे येथील भाटघर व वीर धरण या प्रकल्पाग्रस्तांचे पुनर्वसन व नागरी सुविधांबाबत

(३८) १७६०६ (०४-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील भाटघर व वीर धरण या प्रकल्पाग्रस्तांचे पुनर्वसन व नागरी सुविधांबाबत मा.मंत्री महोदय यांच्या सोबत दिनांक २३ जानेवारी, २०१४ रोजी झालेल्या बैठकीत या प्रकल्पातील पुनर्वसित नागरी सुविधा पुरविण्यासाठीची दुस-या टप्प्यातील कामे जलसंपदा विभागाने करावयाची होती, परंतु जलसंपदा विभागाकडे पुरेसे कर्मचारी नसल्याने लोकप्रतिनिधींनी सदर कामांचे नियोजन, अंदाजपत्रके व निधी मागणीचा प्रस्ताव जलसंपदाऐवजी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करावा अशा सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सूचनेनूसार उपरोक्त कामांचे नियोजन, अंदाजपत्रके व निधी मागणीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने शासनास सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०९-०३-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ पुणे यांनी दि. ०६/०२/२०१४ रोजी भाटघर व वीर प्रकल्पाकरिता निधी मागणी प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्ताव स्वतंत्रपणे निधी उपलब्धतेच्या अनुषंगाने वित्त विभागास सादर करण्यात आला असता तो वित्त विभागाने आमान्य केला आहे. तद्नंतर पुनश्च: सदर मागणीचा वित्तीय नियोजनाच्या प्रस्तावामध्ये समावेश करण्यात येऊन प्रस्ताव नियोजन विभागास सादर करण्यात आला असता नियोजन विभागाने देखील प्रस्ताव अमान्य केल्याने भाटघर व वीर प्रगकल्पांतर्गत निधी मागणी मान्य करता आलेली नाही.

नाशिक जिल्हयात सन २०१४-२०१५ पासून ५ हजार ५८२ शेतकऱ्यांचे राष्ट्रीय कृषी विकास योजनेतील कांदा चाळीचे प्रस्ताव अनुदानामुळे प्रलंबित असल्याबाबत

(३९) १८२६७ (११-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयात सन २०१४-२०१५ पासून ५ हजार ५८२ शेतकऱ्यांचे राष्ट्रीय कृषी विकास योजनेतील कांदा चाळीचे प्रस्ताव अनुदानामुळे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच राष्ट्रीय कृषी विकास योजनातून दुष्काळसदृश्य परिस्थितीत बहुवार्षिक फळपिके वाचविण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांसाठी येवला व निफाड तालुक्यातील शेतकऱ्यांचे १० कोटी ५५ लाख रुपये अनुदान शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबतचे शेतकऱ्यांचे प्रलंबित अनुदान तातडीने वितरीत करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. एकनाथराव खडसे (२०-०२-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.
राष्ट्रीय कृषी विकास योजनंतर्गत सन २०१४-१५ मध्ये नाशिक जिल्हयातील एकूण ३०१६ शेतक-यांचे कांदाचाळ उभारणीचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी १८११ शेतकऱ्यांचे अनुदान वाटप शिल्लक होते.
(२) हे खरे नाही.
(३) राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत सन २०१४-१५ मधील नाशिक जिल्हयातील प्रलंबित कांदाचाळ प्रस्तावाकरीता रु. १४४५.११ लाख इतके अनुदान वितरीत करण्यात आले असून, अनुदान वाटप सुरु आहे.

राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून दुष्काळसदृश्य परिस्थितीत बहुवार्षिक फळपिके वाचविण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांसाठी निफाड तालुक्यामध्ये अनुदान वाटप प्रलंबित नाही. येवला तालुक्यामध्ये रु.७०.६५ लाख इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्यातील सिंधुदुर्ग व कोल्हापूर या गोवा राज्यातील सीमालगतच्या जिल्ह्यातील प्रवासी वाहनांना व व्यावसायीकांच्या वाहनांना वाहन कर प्रवेश आकारणीतून सूट दिल्याबाबत

(४०) १९४९६ (०६-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील सिंधुदुर्ग व कोल्हापूर या गोवा राज्यातील सीमालगतच्या जिल्ह्यातील प्रवासी वाहनांना व व्यावसायीकांच्या वाहनांना वाहन कर प्रवेश आकारणीतून गोवा शासनाने सूट दिल्याबाबतचा निर्णय नोव्हेबर २०१३ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या परिवहन खात्यास कळविला होता हे खरे आहे काय,

(२) असल्यास,गोवा राज्याने आता २ जून, २०१५ पासून ही वाहन कर सवलत रद्द केल्याबाबत महाराष्ट्र राज्याच्या परिवहन खात्यास कळविले आहे काय,

(३) नसल्यास, सिधुंदुर्ग व कोल्हापूर जिल्ह्यातील गोवा राज्यात नियमीत वाहतूक करणाऱ्या प्रवासी वाहन धारक व व्यावसायीक यांना वाहन कराचा भूर्दड सहन करावा लागणार असल्याने त्यांनी आंदोलनात्मक भूमिका घेतली असल्यामुळे महाराष्ट्र शासनातर्फे गोवा राज्यात वाहन प्रवेश करातून सिंधुदुर्ग व कोल्हापूर जिल्ह्यातील वाहनांना वगळण्यात यावे अशी विनंती राज्य शासनामार्फत करण्याबाबतची शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२६-०२-२०१६) : (१) व (२) हे खरे नाही.

(३) याबाबत गोवा शासनास विनंती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्ह्यातील शेतक-यांनी अनुदानावर दोन वर्षापूर्वी खरेदी केलेले स्प्रिंकलर सेटचे अनुदानाच्या फाईल दोन वर्षापासून पडून असल्याबाबत

(४१) १९७७८ (१२-०८-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील शेतक-यांनी अनुदानावर दोन वर्षापूर्वी खरेदी केलेले स्प्रिंकलर सेटचे अनुदानाच्या फाईल दोन वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती संबंधितावर कारवाई करण्याबाबत तसेच शेतक-यांना त्यांचे अनुदान तातडीने देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०९-११-२०१५) : (१) वाशिम जिल्हयातील सन २०१३-१४ पर्यंतचे सर्व प्रस्ताव निकाली काढण्यात आले आहेत. सन २०१४-१५ या वर्षातील रु. १५१२.६६ लक्ष एवढ्या रक्कमेचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

(२) व (३) उपलब्ध अनुदानापेक्षा जास्त रक्कमेचे प्रस्ताव प्राप्त झाल्याने प्रस्ताव प्रलंबित राहिलेत. यासाठी कोणीही अधिकारी दोषी नाहीत. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील मलबार हिलवरील अत्यंत मोक्याची जमीन अल्प किंमतीत ॲण्टिलिया कंपनीया दिल्याबाबत

(४२) १९८६५ (११-०८-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मलबार हिलवरील अत्यंत मोक्याची जमीन अल्प किंमतीत ॲण्टिलिया कंपनीला दिल्याप्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली काय, सदर चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, अहवालाचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे, तद्नुसार घोटाळ्यात दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६) : (१) व (२) नाही. तथापि, वक्फ मंडळातील कथित गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी न्या, ए.टी.ए.के. शेख, सेवा निवृत्त सत्र न्यायाधिश यांची चौकशी आयोग म्हणून नियुक्ती करण्यात आली होती व त्यांनी चौकशी केलेल्या प्रकरणांमध्ये सदर प्रकरणांचा देखील समावेश आहे. सदर चौकशी आयोगाने चौकशी अंती सादर केलेला अहवाल व त्यानुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीचा कृती अहवाल दि.१०.०४.२०१५ रोजी विधान मंडळाच्या दोन्ही सभगृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेला आहे.

(३) न्या. ए.टी.ए.के. शेख चौकशी आयोगाने सदर प्रकरणी झालेल्या गैरव्यवहारासाठी वक्फ मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष श्री. एम.ए. अजीज (आता मयत) व तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. एम.वाय.पटेल (आता सेवा निवृत्त) हे जबाबदार असल्याचे नमूद केले अहे यापैकी श्री. एम.ए.अजीज आता मयत झालेले असल्याने त्यांच्या विरुध्द कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. श्री.एम.वाय.पटेल हे मूलत: ग्रामविकास विभागाच्या आस्थापनेवरी अधिकारी होते. न्याय.ए.टी.एके. शेख आयोगाच्या अहवालातील प्रकरणांमध्ये ग्रामविकास विभागातील अधिका-यांनी त्यांच्या अधिकार कक्षेचे उल्लंघन केले असल्याचे आयोगाने नमूद केले आहे, अशा सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द तातडीने शिस्तभंग विषयक कार्यवाही करणेबाबत दि.०९.०४.२०१५ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये ग्रामविकास विभागास कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय कृषी पीक विमा योजनेंतर्गत १ हजार ६०० कोटीची रक्कम मंजूर झालेली असतानाही, सदरहू निधी अद्यापी न मिळाल्याबाबत

(४३) २०१५५ (१२-०८-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी दुष्काळ, अवकाळी पाऊस आणि गारपीठ अशा तिहेरी संकटात वारंवार सापडलेला असून राष्ट्रीय कृषी पीक विमा योजनेंतर्गत १ हजार ६०० कोटीची रक्कम मंजूर झालेली असतानाही, सदरहू निधी अद्यापी आपतग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत पोहचलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २५ हजारांपेक्षा जास्त गावांना दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागत असल्याचे तसचे २८ लाख हेक्टर जमिनीवरील पिकांचा विमा काढण्यासाठी शेतकऱ्यांनी विमा कंपनीकडे १७६ कोटीचा हप्ता भरलेला असताना दुष्काळाने गेल्यावर्षीही शेतकऱ्यांच्या पिकांचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असतानाही, राष्ट्रीय कृषी पिक विमा योजनेंतर्गत मंजूर झालेले १ हजार ६०० कोटींची निधी शेतकऱ्यांना वितरीत करण्यास विलंब झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिकविम्यांची रक्कम वितरीत करण्यात होत असलेल्या विलंबामुळे पिक विम्याच्या भरपाईची रक्कम तातडीने शेतकऱ्यांना देण्यात यावी, या मागणीसाठी काही लोकप्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने मा.मुख्यमंत्र्याची दिनांक २० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास प्रत्यक्ष भेट घेवून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू पीक विम्यांचे मंजूर झालेली रक्कम शेतकऱ्यांना प्रत्यक्षात लवकरात लवकर वितरीत होण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-०९-२०१५) : (१) व (२) राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप २०१४ मध्ये राज्यातील ४४.७९ लाख शेतक-यांनी रु. १७६.२४ कोटी विमा हप्ता भरुन २८.०५ लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षीत केले होते. त्यापैकी ३४.८७ लाख शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले असून पात्र ठरलेल्या शेतक-यांना रु. १५९५.६५ कोटी इतकी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आली आहे.

भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत सदरची रक्कम दिनांक १० जून, २०१५ ते २८ जुलै, २०१५ च्या दरम्यान लाभार्थी शेतक-यांच्या संबंधीत बँककडे वर्ग करण्यात आली आहे व संबंधित बँकेमार्फत शेतक-यांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे.

(३) पिक विम्याच्या भरपाईची रक्कम देण्याबाबत मागणी होत होती, हे खरे आहे,

(४) नुकसान भरपाईची रक्कम पात्र शेतक-यांच्या खात्यावर तातडीने जमा करणेबाबत संबंधीत बँकांना सूचना देणेबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना शासनस्तरावरुन कळविण्यात आले होते. योजनेच्या निकषानुसार नुकसान भरपाईस पात्र ठरलेल्या शेतक-यांना रु. १५९५.६५ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आली असून दिनांक १० जून, २०१५ ते २८ जुलै, २०१५ च्या दरम्यान लाभार्थी शेतक-यांच्या संबंधीत बँकेकडे भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत वर्ग करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध देण्यासाठी क्षेत्र विकास कार्यक्रम कार्यान्वित करण्याबाबत

(४४) २०२११ (१२-०८-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्र विकास कार्यक्रम कार्यान्वित करण्याबाबत २०१४-२०१५ या विषयीचा अल्पसंचयाक विभाग, शासन निर्णय : ग्राक्षेवि २०१४/प्र.क्र.५१/१४/का-७, दिनांक २१ जून, २०१४ रोजी शासनाने एक आदेश निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू शासकीय निर्णयाला अनुलक्षून जिल्हाधिकारी, लातूर यांच्या कार्यालयाने जावक क्र. २०१४-१५/जिनिस/अल्पसंख्याक/ग्रोक्षेवि/कार्या-९/२९५, दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजी प्रपत्र - ब मध्ये रितसर प्रक्रिया करुन १३ ग्रामपंचायतीचे प्रस्ताव अल्पसंख्याक विभाग, मंत्रालय यांचेकडे सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, निर्णयाअंती प्रस्तावावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-०९-२०१५) : (१) होय.

(२) होय.

(३) या विभागाच्या दि. २१ जून, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.१ सप्टेंबर, २०१४ पर्यंत अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतीचे प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून शासनास सादर करणे अपेक्षित होते.

जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडून दि. १० फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनास १३ ग्रामपंचायतीचा प्रस्ताव सादर केला होता. उपरोक्त प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. नियोजन व वित्त विभागाची प्रस्तावाला ३१ मार्च २०१५ अखेर मान्यता मिळाली नाही. त्यानंतर सल २०१५-१६ वर्षामध्ये सदर योजना सुधारित स्वरुपात राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर त्यानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचयातींना अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यासाठी संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात येतील.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

डहाणु तालुक्यात कृषी विभागातर्फे बांधण्यात आलेले सिमेंट बंधारे निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(४५) २०३९२ (१४-०८-२०१५). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणु तालुक्यात कृषी विभागातर्फे बांधण्यात आलेले सिमेंट बंधारे निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे पाणीसाठा करु शकले नाही, त्यामुळे पावसाळ्यात अडवलेले सर्व पाणी निघुन जावुन बंधाऱ्यांवरील लाखो रुपयांचा खर्च वाया गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, याबाबतची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

सदर बंधाऱ्याची तपासणी मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी व उप विभागीय अधिकारी, पालघर यांच्या मार्फत करण्यात आली असून बंधाऱ्यांचा दर्जा चांगला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रेणापूर (जि.लातूर) येथील राज्य परिवहन विभागाच्या बस स्थानकात प्रवाशाकरीता प्रसाधन गृह व इतर मुलभूत सुविधा नसल्याबाबत

(४६) २१०२९ (०६-०८-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर (जि.लातूर) येथील राज्य परिवहन विभागाच्या बस स्थानकात प्रवाशांकरीता प्रसाधन गृह व इतर मुलभूत सुविधा नसल्याने प्रवाशांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत असल्याची बाब दिनांक २१ मे २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर बसस्थानकाच्या दुरुस्ती बाबत व प्रवाशांना मुलभूत सुविधासाठी सोयी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२२-०२-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) बसस्थानकाची दुरुस्ती व रंगरंगोटी करण्यात आली. तुटलेले पत्रे बदलण्यात आले. प्रवाशांना पिण्याच्या पाण्याची ग्रामपंचायतीकडून नळ कनेक्शन घेण्यात आले. पाण्याची टाकी बसविण्यात आली आहे. बसस्थानकाच्या जागेभोवती संरक्षण भिंत बांधण्यात आली आहे. वाहनतळातील खड्डे बुजविण्यात आले आहेत. तसेच बसस्थानकांत लाईट, पंखे, आरक्षण व्यवस्था, वाहतूक नियंत्रण व्यवस्था इत्यादी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

रेणापूर बसस्थानकातील प्रसाधनगृह सेवा बंद असल्याकारणाने सदर प्रसाधनगृहाबाबत अत्याधुनिक सेवा पुरविण्याकरीता निविदा मागविणेची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यावाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील मोरभवन ही जागा महाराष्ट्र राज्य परिमंडळ यांना शहर बस वाहतुक सेवेकरीता दिल्याबाबत

(४७) २१२८६ (१२-०८-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मोरभवन ही जागा महाराष्ट्र राज्य परिमंडळ यांना शहर बस वाहतुक सेवेकरीता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शहरातील किती जागा वापराकरिता देण्यात आल्या आहेत, सदर दिलेल्या जागांचा वापर होत आहे काय,

(३) असल्यास, सदर जागा महानगरपालिका यांना हस्तांतरित का करण्यात आली नाही,

(४) असल्यास, याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही प्रस्तावित आहे, याचप्रमाणे, मोरभवन येथे १९८७ ला देण्यात आलेली अतिरिक्त जागेचा काय उपयोग होत आहे तसेच रहाटे कॉलनी येथे देण्यात आलेल्या पीकेव्ही च्या जागेची आजची स्थिती काय, येथुन ग्रामीण वाहतुक केव्हापासून सुरु झाली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२२-०२-२०१६) : (१) हे खरे आहे.

(२) नागपूर शहरातील गणेशपेठ बसस्थानक, वर्धमान नगर आगार, घाटरोड/इमामवाडा आगार, गांधीबाग बसस्थानक, हनुमाननगर या पाच ठिकाणी नागपूर सुधार प्रन्यासकडुन लिजवर जागा राज्य परिहवन महामंडळने घेतली असून सदर जागेचा वापर होत आहे.

(३) मोरभवन बसस्थानकाकरीता एकूण १०४२६ चौ.मी. जागा रु. १,८२,४६,८४७/- रक्कम भरुन राज्य परिवहन महामंडळाने संपादित केली असून सदर जागेवरुन राज्य परिवहन बस वाहतूक सुरु आहे. तसेच महामंडळाकडे इतरत्र जागा उपलब्ध नसल्याने या जागेचा वापर महामंडळाकडून होत आहे.

(४) मोरभवन येथे १९८७ मध्ये देण्यात आलेल्या अतिरिक्त जागेचा उपयोग राज्य परिवहन वाहतूकीकरिता करण्यात येत आहे. रहाटे कॉलनी येथील कोणतीही जागा राज्य परिवहन महामंडळाच्या ताब्यात नाही. त्यामुळे मोरभवन येथूनच राज्य परिवहन बस वाहतूक सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठाची शासकीय जमीन बिजोत्पादनासाठी खाजगी कंपन्यांना दिल्याबाबत

(४८) २१३८८ (०६-०८-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठाची शासकीय जमीन बिजोत्पादनासाठी खाजगी कंपन्यांना दिली, हे खरे आहे काय,

(२) सदर कृषी विद्यापीठाची शेकडो एकर सुपीक जमीन विना वापर पडून असल्याने पडीक झाली हे खरे आहे काय,

(३) सदर कृषी विद्यापिठाची विनावापर जमीन शेतकऱ्यांनी कसण्यासाठी विद्यापीठाकडे मागणी केली हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त जमिन शेतक-यांना देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-०९-२०१५) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलासाठी संपादित केलेली जमिन संशोधनात्मक प्रयोग, पिक प्रात्यक्षिके, विद्यार्थी संशोधन प्रयोग, शेती पिके घेण्यासाठी वापरात असून शासनाच्या आदेशानुसार निरनिराळ्या पिकांचे मुलभूत, पायाभूत, पैदासकार, सत्यस्थितीदर्शक बियाण्यांचे बिजोत्पादन दरवर्षी घेण्यात येते. त्यामुळे अतिरिक्त जमिन उपलब्ध नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारा जिल्ह्यात कृषी विभागाअंतर्गत साकोली येथे गेल्या ५ वर्षापासून मंडळ कृषी अधिका-यांचे पद रिक्त असल्याबाबत

(४९) २१५१० (११-०८-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात कृषी विभागाअंतर्गत साकोली येथे गेल्या ५ वर्षापासून मंडळ कृषी अधिका-यांचे पद रिक्त असून लाखांदूर येथे कृषी सहाय्यकांच्या १३ मंजूर पदांपैकी ६ रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिसरातील शेतक-यांना कृषीविषयक योजनांची माहिती घेण्यासाठी १०-१० कि.मी. पर्यंत पयापिट करीत माघारी जावे लागत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील कृषी विभागातील पदे तातडीने भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०३-११-२०१५) : (१) भंडारा जिल्ह्यात कृषी विभागातंर्गत साकोली येथे मंडळ कृषि अधिकारी हे पद नियमित पदस्थापनेने भरलेले नाही. तथापि सदर पदाचा अतिरिक्त पदभार देऊन पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. लाखांदूर येथे कृषि सहाय्यकाची १३ मंजूर पदांपैकी १० पदे भरलेली आहेत व ३ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या कृषि सहाय्यकाकडे सोपविण्यात आला आहे. कृषि अधिकारी संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने तसेच कृषि सकाय्यकाची रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबतची कार्यवाही कृषि आयुक्तालय स्तरावरुन कार्यान्वित आहे.
(२) नाही. रिक्त असलेल्या कृषि सहाय्यकाच्या पदाचा कार्यभार नजीकच्या कृषि सहाय्यकाकडे सोपविण्यात आलेला आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना कृषि विषयक योजनांची माहिती संबंधित कृषि सहाय्यकाकडून देण्यात येत आहे.
(३) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कापसाच्या स्वदेशी-५ व अंबिका-१२ व १८ राशी-५ या बियाण्यांचा तुटवडा असल्याबाबत

(५०) २१५३१ (१२-०८-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कापसाच्या स्वदेशी-५ व अंबिका-१२ व १८ राशी-५ या बियाण्यांचा तुटवडा असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर बियाणे शेतक-यांना तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१५-०२-२०१६) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) कापसाच्या स्वदेशी ५, अंबिका-१२, अंबिका-१८ या देशी संकरीत कापूस बियाण्यांच्या वाणांना नाशिक विभाग वगळता उर्वरीत भागात जास्त मागणी नाही. बियाणे उत्पादक कंपन्यांना महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा शेजारील मध्यप्रदेश व गुजरात राज्यात जास्त दर मिळत असल्याने उत्पादक कंपन्या त्या राज्यात बियाणे पुरवठा करतात. त्यामुळे महाराष्ट्रात पेरणीच्या हंगामात सदर बियाणांचा पुरवठा कमी होतो. त्यामुळे काही प्रमाणात तुटवडा जाणवतो, राशी-५ हा वाण अस्तित्वात नाही.

(३) कापूस उत्पादक कंपन्यांना बी.टी. विरहीत संकरीत कापूस बियाणे स्वदेशी-५ अंबिका-१२ व १८ या बियाण्यांचा पुरवठा राज्यात करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे. राशी-२, राशी-११८, राशी-१३८ इ. बी.टी. कापूस वाणांचे बियाणे खरीप २०१५ च्या हंगामात मुबलक प्रमाणात उपलब्ध होते.

(४) विलंब झालेला नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.